जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०१/२०२५
## दि.०४/०१/२०२५ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ०३/२०२५,भा.न्या.सं.कलम १०३(अ) |
| **फिर्यादी** | केतन धेंडे वय ३५ वर्षे,पोलीस अंमलदार लोणीकाळभोर पोलीस स्टेशन पुणे शहर. |
| **आरोपीत** | एक इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१२/२०२४ रोजी सायं.१९/३० वा.सुमा. कांबळे यांचे खोलीत,रायवाडी रोड,लक्ष्मीमात मंदीरा जवळ लोणी काळभोर,पुणे |
| **तपशिल** | लोणी काळभोर पो स्टे अ.मयत रजि.नं. ०१/२०२५, भारतीय नागरी सुरक्षा संहीता कलम १९४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती व कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम याने यातील मयत इसम योगेश लक्ष्मण काळभोर वय ४५ वर्षे रा.दुंडे वस्ती, लोणी काळभोर पुणे यांस शिवीगाळ करून दारु पिण्यासाठी पैसे देत नाहीस, असे म्हणुन डोक्यात सिमेंटचे गट्टुने मारहाण केल्याने तो गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मयत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.रत्नदीप बिराजदार मो.नं.९४२१४४४४५५ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७/२०२५,भा.न्या.सं.कलम १०६(१)मो.वा.का.क.११९/१७७, १८४ |
| **फिर्यादी** | मधुकर गवळी वय ५८ वर्षे रा.मरकळ रोड,आळंदी, |
| **आरोपीत** | बोरवेल्स ट्रक वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१२/२०२४ रोजी रात्रौ. १०/३० वा. सुमा.शेवाळवाडी चौकामध्ये सिग्नलला घडला असे. |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील बोरवेल्स ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा मुलगा ओकांर मधुकर गवळी वय २७ वर्षे रा.सदर यांच्या मोटार सायकलला जबर ठोस मारून, गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला.**(उशीराचे कारण-** सर्व धार्मिक विधी करून आल्यावर फिर्याद दिली) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अनिल बिनवडे मो.नं. ९१५८८८८१०० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे ०७/२०२५,भा.न्या.सं.कलम १३२,१२१(१),७४,७९,३५२,३५१(२),मो.वा.का.क.११९/१७७ |
| **फिर्यादी** | ऋतुजा तांबे महिला पोलीस अंमलदार वारजे वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपीत** | एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०२५ रोजी साय.१९/३०वा.चे.सुमा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,वारजे याठिकाणी सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणी स्टाफसह वाहतुक नियमन करीत असताना नमुद महिला हिने आपल्या ताब्यातील मोटर सायकल ही वाहतुकीचे नियम न पाळता विरुध्द दिशेने येत असताना तीचेवर वाहतुक नियमाप्रमाणे कारवाई करत असताना तिने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन फिर्यादी यांना मदत करण्याकरीता आलेल्या महिला पोलीस शिपाई चव्हाण यांना देखील शिवीगाळ करुन, धमकी देऊन फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पवार मो.नं.९९२२४२६१८२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३४ वर्षे रा.मांजरी बुा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०२५ रोजी संध्या.१८/३० ते १८/४० वा.चे दरम्याने रविदर्शन हडपसर येथील व्यापारी मॉल आणि रविदर्शन येथील चारचाकी वाहनामधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी खरेदीसाठी गेले असता नमुद इसम यांने फिर्यादी यांना पैसे खाली पडले आहेत असे सांगुन फिर्यादी यांचे गाडीतुन सोन्याचे दागिणे व रोख रक्कम तसेच दुसरे साक्षीदार यांचे गाडीतुन एक लॅपटॉप व रोख रक्कम असा एकूण १,५१,०००/- रू.कि.चा.ऐवज चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश कवळे मो.नं.९६८९९५६९९९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ०५/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६९ वर्षे रा.शिवाजीनगर गावठाण,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०१/२०२५ रोजी सायं.१६/०० वा.चे सुमा.स्वारगेट ते न.ता.वाडी बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरून बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे हातातील ८०,०००/-रू.किं.ची सोन्याची पाटली चोरी करून नेली. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार अहिरे मो.नं ७३८५८३३३६३ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बाणेर पो स्टे १०/२०२५,भा.न्या.सं.कलम ३१८(४),३१९(२),२०४,६१(२) आयटीॲक्ट६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४५ वर्षे रा.पाषाण पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि २८/१०/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी पोलीस असल्याची बतावणी करून विश्वास संपादन करून फिर्यादीचे विरोधात मनी लॉड्रींगची केस आहे असे सांगून चौकशी करण्याचे बहाण्याने फिर्यादी यांना पैसे पाठविण्यास सांगुन फिर्यादीची ३,००,०००/- रू.ची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक श्रीमती राणी पुरी मो नं ८१०८०६११०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**